अमेरिकेत पुरामुळे अनेकांचे स्थलांतर

वॉशिंग्टन : आठवडाभरातील मुसळधार पावसामुळे अमेरिकेच्या आयोवा राज्यात पूरस्थिती निर्माण होऊन अनेकांचे विस्थापन करण्यात आले. एकीकडे पूरस्थिती असताना, दुसरीकडे अमेरिकेच्या बराचशा भागात शनिवारी नागरिकांना उष्णतेचा सामना करावा लागला. आयोवा राज्यात मुसळधार पावसामुळे रॉक नदी दुथडी भरून वाहत असल्याने रॉक व्हॅली येथे शनिवारी मध्यरात्री भोंगे वाजवून सुमारे ४ हजार २०० नागरिकांना घरातून बाहेर पडण्याच्या सूचना करण्यात आल्या. सुरुवातीला नागरिकांच्या मदतीसाठी हेलिकॉप्टर तैनात करण्यात आले, नंतर अडकलेल्या रहिवाशांपर्यंत बोटी पोहोचल्याने हेलिकॉप्टरद्वारे मदतकार्य बंद करण्यात आल्याची माहिती महापौर केविन व्हॅन ऑटरलू यांनी दिली.

श्रीलंकेकडून भारताच्या १८ मच्छीमारांना अटक

कोलंबो : श्रीलंकेच्या नौदलाने बेकायदेशीर मासेमारी केल्याप्रकरणी तब्बल १८ भारतीय मच्छीमारांना अटक केली आहे. या कारवाईत तीन बोटी जप्त करण्यात आल्याचे स्थानिक प्रसारमाध्यमांनी रविवारी सांगितले. शनिवारी रात्री डेल्फ्ट बेटांजवळील उत्तर समुद्रातून मच्छीमारांना अटक करण्यात आल्याचे 'द न्यूज फर्स्ट' या वृत्त संकेतस्थळाच्या शोधमोहिमेत समोर आले. नौदलाचे प्रवक्ते कॅप्टन ग्यान विक्रमसूर्या यांनी सांगितले की, अटक केलेल्या मच्छीमारांना पुढील कायदेशीर कारवाईसाठी कानकेसंतुराई मासेमारी बंदरात नेले जाईल.

बिहारमध्ये निर्माणाधीन पूल कोसळला

मोतीहारी : पूर्व चंपारण जिल्ह्यातील मोतीहारी येथील घोरासहन विभागात रविवारी बांधकाम सुरू असलेला लहान पूल कोसळल्याची घटना घडली. या घटनेत कोणीही जखमी झालेले नाही. मात्र गेल्या आठवडाभरात पूल कोसळण्याची ही बिहारमधील तिसरी घटना ठरली आहे. पूल कोसळणे ही गंभीर बाब असून चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत. दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असे ग्रामीण बांधकाम विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव दीपक कुमार सिंग यांनी 'पीटीआय'ला सांगितले.

सूरज रेवण्णाला अटक

कार्यकर्त्याच्या कथित लैंगिक शोषणाचा आरोप, तपास सीआयडीकडे

पीटीआय, बंगळुरू

जनता दलाचे (धर्मनिरपेक्ष) आमदार सूरज रेवण्णा (३७) याच्याविरुद्धचे पुरुष कार्यकर्त्याच्या कथित लैंगिक शोषण प्रकरण तपासासाठी गुन्हे अन्वेषण विभागाकडे (सीआयडी) सोपवण्यात आल्याची माहिती कर्नाटकचे गृहमंत्री जी. परमेश्वरा यांनी रविवारी दिली. शनिवारी सूरज विरोधात विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल करून त्याला रात्री अटक करण्यात आली होती. अलिकडेच सूरजचा भाऊ माजी खासदार प्रज्वल रेवण्णालाही महिलांचे लैंगिक शोषण केल्याच्या आरोपप्रकरणी अटक करण्यात आली आहे.

होलेनारसीपुराचे आमदार एच.डी. रेवण्णा यांचा मोठा मुलगा सूरजने १६ जून रोजी घनिकाडा येथील फार्महाऊसवर आपले लैंगिक शोषण केल्याची तक्रार एका २७ वर्षीय तरुणाने पोलिसांकडे केली होती. या तक्रारीच्या आधारे होलेनारसीपुरा पोलिसांनी शनिवारी सायंकाळी उशिरा सूरजविरोधात गुन्हा दाखल केला. सूरजविरोधात भारतीय दंड संहितेच्या कलम ३७७, ३४२, ५०६, ३४ अंतर्गत दाखल झालेला गुन्हा पुढील तपासासाठी सीआयडीकडे हस्तांतरित करण्यात आला आहे. तसेच या प्रकरणाची फाइल सीआयडीकडे सोपविण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

पोलिसांनी सूरजविरोधात गुन्हा दाखल केला असून, चौकशी सुरू असल्याची माहिती गृहमंत्री परमेश्वरा यांनी पत्रकारांशी बोलताना दिली. हे प्रकरण तपासासाठी सीआयडीकडे सोपवण्यात आले आहे. याप्रकरणात आवश्यक ती कारवाई केली जाईल. सूरज रेवण्णा याने आपल्या कुटुंबाविरुद्ध कट रचल्याचा आरोपही परमेश्वरा यांनी केला. त्याशिवाय मला कोणत्याही राजकीय कटाची माहिती नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. शनिवारी रात्री अटक करण्यापूर्वी, सूरजची हसनमधील सायबर इकॉनॉमिक अँड नार्कोटिक्स (सीईएन) गुन्हे पोलीस ठाण्यात चौकशी करण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली. यानंतर त्याला वैद्यकीय तपासणीसाठी हसन इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस येथे नेण्यात आले.

५ कोटी उकळण्यासाठी तक्रार

माजी पंतप्रधान एच.डी. देवेगौडा यांचे नातू आणि केंद्रीय मंत्री एच.डी. कुमारस्वामी यांचा पुतण्या असलेल्या सूरज रेवण्णाने आपल्यावरील सर्व आरोपांचे खंडन केले आहे. आपल्याकडून ५ कोटी रुपये उकळण्यासाठी ही खोटी तक्रार दाखल केल्याचा आरोपही त्याने केला. सूरजचे निकटवर्तीय शिवकुमार यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी शुक्रवारी जनता दलाच्या कार्यकर्त्याविरुद्ध खंडणीचा गुन्हा दाखल केला. हा कार्यकर्ता सूरज रेवण्णा याच्यावर लैंगिक अत्याचाराचा खोटा गुन्हा दाखल करण्याची धमकी देऊन पैसे उकळण्याचा प्रयत्न करत होता, असा आरोप शिवकुमार यांनी केला.

अटकेमागे कारस्थान : एच. डी. रेवण्णा

आमदार आणि कर्नाटकचे माजी मंत्री एच. डी. रेवण्णा यांनी मुलगा सूरजच्या अटकेमागे मोठे कारस्थान असल्याचा आरोप केला आहे. तसेच देव आणि न्यायव्यवस्थेवर विश्वास असून, वेळ आल्यावर सर्व काही सांगने, असेही ते म्हणाले. सध्या मी काहीही बोलणार नाही. याप्रकरणाचा तपास सीआयडीला करू द्या. न्यायपालिकेचा मी आदर करतो. राज्यात काय सुरू आहे, हे मला माहीत असल्याचे रेवण्णा म्हणाले. तसेच अशा कारस्थानांना मी घाबरत नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

'नीट-यूजी'ची प्रश्नपत्रिका फुटल्याचे संकेत

बिहारचा केंद्र सरकारकडे अहवाल सादर; संघटित टोळ्यांच्या सहभागाकडे अंगुलीनिर्देश

संतोष सिंह, एक्स्प्रेस वृत्त

पाटणा : 'नीट-यूजी' परीक्षेतील कथित अनियमिततांची चौकशी करणाऱ्या, बिहार सरकारच्या आर्थिक गुन्हे शाखेने (ईओयू) शनिवारी आपला अहवाल केंद्र सरकारला सादर केला. 'नीट-यूजी' परीक्षेमध्ये प्रश्नपत्रिका फुटल्याचे स्पष्ट संकेत चौकशीतून मिळाल्याचे या अहवालात नमूद केल्याची माहिती 'इंडियन एक्स्प्रेस'ला मिळाली आहे.

सहा पानी अहवालात जप्त केलेल्या कथित प्रश्नपत्रिकेचे अवशेष, आरोपींची चौकशी व कबुलीजबाब आणि परीक्षार्थींची चौकशी यांचा संदर्भ दिला आहे. 'नीट-यूजी'ची ५ मे रोजी परीक्षा झाल्यानंतर 'ईओयू'ने चार परीक्षार्थींसह १३ जणांना अटक केली होती. केंद्र सरकारने 'ईओयू'ने केलेल्या चौकशीचा अहवाल मागवला होता. बिहारचे अतिरिक्त पोलीस महासंचालक एन. एच. खान यांच्या नेतृत्वाखाली ईओय पथकाने तपास केला आहे.

सूत्रांनी 'इंडियन एक्स्प्रेस'ला सांगितले की, 'शिक्षण मंत्रालयाला दिलेल्या अहवालात साधारणतः तीन मुद्द्यांचा उल्लेख आहे; आतापर्यंत मिळालेल्या पुराव्यांच्या आधारे प्रश्नपत्रिका फुटल्याचे स्पष्ट संकेत, आंतरराज्य टोळीचा संभाव्य सहभाग आणि बिहारच्या कुख्यात 'सॉल्व्हर्स गँग'ची संशयास्पद भूमिका.' यापूर्वी खान यांनी 'इंडियन एक्स्प्रेस'शी बोलताना प्रश्नपत्रिका फुटल्याची शक्यता व्यक्त केली होती.

अहवालामध्ये झारखंडमध्ये पाळेमुळे असलेल्या आंतरराज्यीय टोळीच्या सहभागाचे पुरावे असल्याचेही नमूद केले आहे. ही टोळी 'सॉल्व्हर्स गँग'बरोबर काम करते. 'ईओयू'ने या गँगचा कथित सूत्रधार संजीव मुखियाला नालंदामधून आणि झारखंडमधून चार संशयितांना अटक केली आहे. प्रत्येक विद्यार्थ्याकडून प्रश्नपत्रिकेसाठी ३० ते ३२ लाख रुपये घेण्यात आल्याचेही नितीश कुमार नावाच्या संशयिताने पोलिसांना सांगितले आहे.

पाकिस्तानी दहशतवाद्यांकडे चीनची दूरसंचार उपकरणे

पीटीआय, श्रीनगर

जम्मू आणि काश्मीरमधील चकमकीत दहशतवाद्यांकडून चिनी बनवटीची 'अल्ट्रा सेट' दूरसंचार उपकरणे जप्त करण्यात आली आहेत. पाकिस्तानी सैन्याने वापरलेली ही उपकरणे दहशतवाद्यांच्या हातात गेल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवाद्यांनी वापरलेले मोबाईल सुरक्षा यंत्रणांनी जप्त केले आहेत. या दहशतवाद्यांना पाकिस्तानी सरकारकडून प्रशिक्षण, शस्त्रे आणि दारूगोळा मिळत असल्याचे स्पष्ट झाल्याचा दावाही अधिकाऱ्यांनी केला. हे मोबाईल केवळ चिनी कंपन्यांनी पाकिस्तानी सैन्यासाठी तयार केले आहेत. गेल्या वर्षी १७-१८ जुलैच्या मध्यरात्री जम्मू विभागातील पूंछ जिल्ह्यातील सुरनकोटच्या सिंदराह भागात झालेल्या चकमकीत आणि या वर्षी २६ एप्रिलला एका गोळीबारानंतर हे मोबाईल जप्त करण्यात आले होते. उत्तर काश्मीरच्या बारामुल्ला जिल्ह्यातील सोपोरच्या चेक मोहल्ला नोपोरा भागात ही चकमक झाली होती. सुरनकोट येथील चकमकीत चार दहशतवादी ठार झाले होते. तर सोपोरमध्ये दोघा दहशतवाद्यांना गोळ्या झाडण्यात आल्या होत्या. 'अल्ट्रा सेट' उपकरणे पीर पंजाल प्रदेशातील दक्षिण भागातही सापडले आहेत.

'दहशतवाद शेवटचा श्वास घेत आहे'

जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवाद शेवटचा श्वास घेत आहे. अलीकडील दहशतवादी कृत्ये शत्रूच्या हतबलतेची चिन्हे आहेत, असे प्रतिपादन नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी रविवारी केले. तलवाडा (जि. रियासी) येथील सहायक पोलीस प्रशिक्षण केंद्रात पोलिसांच्या १६ व्या 'बेसिक रिक्रूट ट्रेनिंग कोर्स बॅच'ची पासिंग आऊट परेड रविवारी पार पडली. या वेळी सिन्हा बोलत होते.

झुंडबळी : पाकिस्तानात २३ जण अटकेत

इस्लामाबाद : कुराणाची विटंबना केल्याच्या आरोपात पाकिस्तानच्या स्वात शहरात एका पर्यटकाला केलेल्या मारहाणीप्रकरणी पोलिसांनी २३ जणांना रविवारी अटक केली. पंजाब प्रांतातील सियालकोट येथील रहिवासी मुहम्मद इस्माईल (४०) यांना गुरुवारी संतप्त जमावाने मारहाण करून त्याच्यावर गोळ्या झाडल्या. यानंतर खैबर पख्तूनख्वा प्रांतातील स्वात जिल्ह्यातील मद्यान येथे सार्वजनिक ठिकाणी फाशी दिली. या वेळी संतप्त जमावाने मद्यान पोलीस ठाण्याची जाळपोळ केली. या घटनेत ५ पोलिसांसह स्थानिक नागरिक जखमी झाले होते.

ब्रिटनचे पंतप्रधान ऋषी सुनक सट्टेबाजीवरून पुन्हा वादात

लंडन : सार्वत्रिक निवडणुकीच्या तारखेवर सट्टा लावण्यात पक्षाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचा सहभाग स्पष्ट झाल्याने ब्रिटनचे पंतप्रधान ऋषी सुनक पुन्हा वादात सापडले आहेत. 'वॉचडॉग'द्वारे त्याच्या या घोटाळ्याची चौकशी सुरू आहे.

निवडणुकीची तारीख जाहीर होण्यापूर्वी सट्टा लावल्याचा आरोप असलेल्या हुजूर पक्षाच्या मुख्य माहिती अधिकाऱ्याची आयोगाकडून चौकशी केली जात आहे. सुनक यांचे प्रचार संचालक टोनी ली आणि टोरी पक्षाच्या उमेदवाराच्या पत्नी लॉरा सॉंडर्स यांचे सट्टेबाजीच्या तपासात नाव आल्यानंतर निवडणूकपूर्व जनमत चाचण्यांमध्ये विरोधी मजूर पक्षापेक्षा पिछाडीवर असलेल्या सुनक यांच्या नेतृत्वाखालील टोरी पक्षासाठी हा मोठा धक्का मानला जात आहे.

पूरनियंत्रणासाठी ईशान्येत तलावांची सूचना

पीटीआय, नवी दिल्ली

ब्रह्मपुत्रेचे पाणी वळवून पुराचा सामना करण्यासाठी आणि कृषी, सिंचन आणि पर्यटनाच्या विकासासाठी ईशान्य भारतात किमान ५० मोठे तलाव उभारण्यात यावेत, असे आदेश केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी रविवारी दिले. आढावा बैठकीत शहा यांनी पूर आणि पाणी व्यवस्थापनासाठी भारतीय अंतराळ संशोधन संस्थेच्या (इस्रो) उपग्रह प्रतिमांचा वापर करण्याच्या सूचनाही संबंधित यंत्रणांना दिल्या.

शहा यांनी 'ग्लेशियल लेक आऊटबर्स्ट फ्लड'चा (जीएलओएफ) सामना करण्याच्या तयारीचा आढावाही यावेळी घेतला. उत्तम पूर व्यवस्थापनासाठी नद्यांच्या पाण्याच्या पातळीची अंदाज प्रणाली सुधारण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. तसेच ईशान्येकडे किमान ५० मोठे तलाव तयार केले जावेत, जेणेकरुन ब्रह्मपुत्रेचे पाणी या तलावांमध्ये वळवता येईल आणि साठवता येईल. यामुळे कमी खर्चात कृषी, सिंचन आणि पर्यटन विकास तसेच पूरस्थिती हाताळण्यासही मदत होईल, असे शहा म्हणाले.

ब्रह्मपुत्रेला वारंवार येणारा पूर ही आसाम आणि ईशान्य प्रदेशाची प्रमुख समस्या आहे. गेल्या काही वर्षांत सिक्कीम आणि उत्तराखंडमध्येही अनेकांचा पुरामुळे मृत्यू झाला, शेकडो नागरिक बेघर झाले. याच पार्श्वभूमीवर रस्ते बांधणीच्या आराखड्यात नैसर्गिक नाले अविभाज्य भाग असावा, असे शहा म्हणाले.

लोकसत्ता Classifieds
FROM ANYTHING TO EVERYTHING.

शैक्षणिक विशेष

शैक्षणिक

सुवर्णसंधी! बी.ए.व्हा! 10/12वी, पास/नापासांना प्रवेश. सरकारमान्य समकक्ष पदवी. डॉ.कानडे, 45 आदित्य शगुन मॉल, बावधन, पुणे. (वेळ स.11 ते 5). 9890344036/ 9890976469.

0090353071-1

विवाहविषयक

मॅरेज ब्युरो

।।पवित्र विवाह।। सौ. कुळकर्णी विवाहसंस्था. इंजिनीअर्स, डॉक्टर्स, CA, MBA, बँकर्स, सरकारी नोकरी, NRI, सुशिक्षित सर्व जातींच्या वधूवरांची भरपूर स्थळे. 8369692734/ 8450914835/ 9892625606.

0070856738-9

महत्त्वपूर्ण निवेदन

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींचा मजकूर (अँडव्हर्टाइजिंग कॉपी) स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची (कन्टेन्ट) पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी, आपल्या वृत्तपत्रांमध्ये अथवा प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तींबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान वा हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी द इंडियन एक्स्प्रेस (प्रा.) लिमिटेडला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे वाचकांना आम्ही असा सल्ला देतो की, जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्यांच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी त्यांनी आवश्यक ती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

WWW.LOKSATTA.COM

शिरूर अनंतपाळ नगर पंचायत

ता. शिरूर अनंतपाळ, जिल्हा-लातूर

ई-निविदा सूचना क्र. १ सन २०२४-२५

महाराष्ट्र सुवर्ण नगरोत्थान (राज्य स्तर) महाअभियानअंतर्गत शिरूर अनंतपाळ शहर पाणीपुरवठा योजना जिल्हा लातूर या कामाची निविदा शिरूर अनंतपाळ नगर पंचायत शिरूर अनंतपाळ यांच्याकडून ब१ नमुन्यात मागविण्यात येत आहे. कामाची अंदाजित किंमत रु. २४,३७,०८,५८६/- आहे. सदर निविदेचा सविस्तर तपशील दिनांक २४.०६.२०२४ पासून ०१.०७.२०२४ पर्यंत https://mahatenders.gov.in या वेब पोर्टलवर उपलब्ध करून देण्यात येईल.

मुख्याधिकारी
शिरूर अनंतपाळ नगर पंचायत, शिरूर अनंतपाळ

दि ओरिएण्टल इंश्योरेंस कंपनी लिमिटेड
(भारत सरकार उपक्रम)
मुंबई क्षेत्रीय कार्यालय ३ , ६ वा मजला, टाऊन सेंटर, टॉवर-१, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०००५९ फोन नं. : ०२२-४१०४२२०१
IRDA पंजी. नं. ५५६, CIN U6610DL1947GOI007158

नोटिस

सर्व पॉलिसीधारक/हित धारक आणि सामान्य जनतेला सूचित करत आहोत कि **महाराष्ट्र** राज्यामध्ये स्थित **मुंबई क्षेत्रीय कार्यालय - ३** अंतर्गत येणाऱ्या खालील कार्यालयाला पुनर्गठित केले जात आहे आणि आई.आर.डी.ए. नियमां (व्यवसाय नियम चे स्थान २०१५) च्या अनुसार दि. **२३-ऑगस्ट-२०२४** पासून तेथून काम सुरू केले जाईल. पॉलिसी/दावे किंवा अन्य सेवा खालील कोष्टकामध्ये दाखविलेल्या नवीन कार्यालयाद्वारे प्रदान केल्या जातील.

पुनर्गठित होणाऱ्या कार्यालयाचे नाव	कार्यालय संकेतांक	सेवा प्रदान केल्या जातील	संपर्क क्रमांक व ई-मेल आयडी
बीओ- भिवंडी मे. मैत्री नभांगण, पहिला मजला एस वी सी बँकेच्या वर, राजाजी रोड, लेन क्रमांक ३ राम नगर, डोंबिवली पूर्व, महाराष्ट्र पिन-४२१२०१,	**१३१५०१**	बीओ -कल्याण- १३१५०० श्री दत्त कृपा गणेश बाग. मुरबाड रोड कल्याण (प) ठाणे, मुंबई, महाराष्ट्र पिन-४२१३०१	सुश्री विजी विश्वनाथ, वरिष्ठ विभागीय व्यवस्थापक मोबाईल क्रमांक : ९८९२५१९३४० ईमेल आयडी: viji.vishwanath@ orientalinsurance.co.in
बीओ-डायरेक्ट एजंट शाखा, मॅग्नेट हाऊस, तिसरा मजला एनएम रोड, बॅलार्ड पिअर, मुंबई महाराष्ट्र, पिन-४००००१	**१३३०००**	बीओ४ (डी ओ) १३२४०० मॅग्नेट हाउस ३ रा मजला एन.एम. रोड, मुंबई महाराष्ट्र, पिन- ४००००१	श्री.रमेश सावतकर वरिष्ठ विभागीय व्यवस्थापक फोन नंबर: ०२२-२२६६१०७२,२२६६१०७७ मोबाईल क्रमांक : ९८६९८७१०५२ ईमेल आयडी: ramesh.sawatkar@ orientalinsurance.co.in

सही / -
मुख्य क्षेत्रीय व्यवस्थापक

SBI

संभाव्य अलाभकारी मालमत्ता वसुली शाखा (सार्ब), छत्रपती संभाजीनगर
प्लॉट नं.१, सिडको टाऊन सेंटर, छत्रपती संभाजीनगर – ४३१ ००३

(अचल मालमत्तेसाठी) **ताबा सूचना** [नियम-८(१)]

ज्या अर्थी खालील सही करणार **भारतीय स्टेट बँक, सार्ब, औरंगाबाद** यांचे अधिकृत अधिकारी यांनी दि सिक्युरिटायजेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शीयल असेटस् अँण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ मधील कायद्याचे नियम ३ सह वाचले जाणारे कलम १३(१२) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कर्जदार **सौ.प्रांजली आनंद शेळके** यांना **दि.०६/०४/२०२४** रोजी मागणी सूचना पाठवुन त्यांनी सुचनेत नमुद दिनांक ०५/०४/२०२४ पर्यंतची रक्कम **रू.२९,४७,६९२.00** (रू.एकोनतीस लाख सत्तेचाळीस हजार सहाशे ब्यान्नव केवळ) अधिक दि.०६/०४/२०२४ पासुनचे पुढील व्याज व इतर शुल्क हे त्यांना नोटीस मिळाल्यापासून ६० दिवसांचे आंत भरणेस कळविले होते.

उपरोक्त नोटीसप्रमाणे मागणी केलेली रक्कम मुदतीत भरण्यास कर्जदार यांनी कसूर केलेली आहे. त्या अर्थी, कर्जदार व तमाम जनतेस कळविण्यात येते की, खाली सही करणार यांनी खालील परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकतीचा उपरोक्त कायद्याचे नियम ८ सह वाचले जाणारे कलम १३(४) अन्वये दिनांक **२१/०६/२०२४** रोजी ताबा घेतला आहे.

सबब विशेषत: कर्जदार व तमाम जनतेस सावध करण्यात येते की, खालील परिशिष्टात नमूद केलेल्या संपत्तीबाबत कोणीही, कसल्याही प्रकारचा व्यवहार करू नये. याउपर कोणीही सदरील संपत्तीबाबत व्यवहार केल्यास तो व्यवहार **भारतीय स्टेट बँक**, यांचा दि.०५/०४/२०२४ पर्यंतची रक्कम **रू.२९,४७,६९२.00** (रू.एकोनतीस लाख सत्तेचाळीस हजार सहाशे ब्यान्नव केवळ) अधिक दि.०६/०४/२०२४ पासूनचे व्याज, दंड व खर्चाच्या बोजासहीत असेल.

संरक्षीत मालमत्तेच्या मुक्ततेसाठी असलेल्या उपरोक्त कायद्यामधील कलम १३ चे उपकलम (८) मधील तरतुदीमधे उपलब्ध असलेल्या वेळेसाठी कर्जदार/जामीनदार यांचे लक्ष वेधण्यात येत आहे.

स्थावर मालमत्तेचे विवरण

सौ.प्रांजली आनंद शेळके यांचे मालकीचा फ्लॅट क्र. ०९ (2BHK), स्टिल्ट दुसरा मजला, सुयोदय विहार, प्लॉट क्र.५, गट क्र.७४/पार्ट, मौजे सातारा, ता.व जि.छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), क्षेत्रफळ ४९.७६ चौ.मी. (बांधीव क्षेत्रफळ), ४५.५८ चौ.मी. (चटई क्षेत्रफळ), ज्याची चतु:सिमा.

पूर्वेस : कासलीवाल मार्व्हल अपार्टमेंट | **पश्चिमेस** : फ्लॅट क्र.१२
उत्तरेस : प्लॉट क्र.०९ | **दक्षिणेस** : फ्लॅट क्र.८

ठिकाण : छत्रपती संभाजीनगर
दिनांक : २१/०६/२०२४
(टिप : स्वैर भाषांतर, तफावत पडल्यास मुळ इंग्रजी ग्राह्य)

सही/-
प्राधिकृत अधिकारी
भारतीय स्टेट बँक (सार्ब), छ.संभाजीनगर

SHREE

TATA

टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय : ११वा मजला, टॉवर 'ए', पेनिनसुला बिझनेस पार्क, गणपतराव कदम मार्ग, लोअर परळ, मुंबई – ४०० ०१३.
शाखा कार्यालय : प्लॉट नं. १८३, दुसरा मजला, माझदा टॉवर, युनिट ०३, जीपीओ रोड, त्रिंबक नाका, नाशिक-४२२००१.

स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता सूचना
(सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स २००२च्या रुल ९(१) यासह वाचलेल्या रुल ८(६) अंतर्गत)

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स २००२च्या रुल ८(६) व ९(१) च्या तरतुदींसह वाचलेल्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव सुचना

आम जनतेस आणि खालील विशेषकरून ऋणको / सह-ऋणको किंवा विशेषकरून त्यांचे विधि वारसदार / प्रतिनिधी (ऋणको) यांना याद्वारा सूचना देण्यात येते की, "**टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि.**"कडे ("**टीसीएचएफएल**") गहाण असलेल्या याखाली वर्णिलेल्या स्थावर मालमत्तेचा ताबा "टीसीएचएफएल"च्या प्राधिकृत अधिकारींद्वारा घेण्यात आलेला आहे, सदर स्थावर मालमत्तेची विक्री याखाली नमूद केलेल्या ऋणको व सह-ऋणकोंकडील थकित देणींच्या वसूलीकरिता "जसे आहे जेथे आहे", "जसे आहे जे काही आहे" व "जे काही आहे तेथे आहे" आणि "कोणत्याही आधाराशिवाय" या तत्त्वावर **२५.०७.२०२४** रोजी करण्यात येणार आहे. राखीव किंमत व इसारा रक्कम ठेव खाली नमूद केली आहे. याद्वारा सूचना देण्यात येते की, विक्रीची तारीख पुढे ढकलणे / विक्री खंडित होणे न झाल्यास, उक्त सुरक्षित मत्ता / मालमत्तेची विक्री **उक्त २५.०७.२०२४ रोजी दु. ०२.०० वा. ई-लिलावाद्वारा** करण्यात येणार आहे. ई-लिलावात सहभागी होण्याकरिता इरटेची डिमांड ड्राफ्ट समाविष्ट मोहोरबंद लिफाफा, शाखेचा पत्ता "**टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि.**", प्लॉट नं. १८३, दुसरा मजला, माझदा टॉवर, युनिट ०३, जीपीओ रोड, त्रिंबक नाका, नाशिक-४२२००१ येथे **२४.०७.२०२४ रोजी सायं. ०५.०० वा. पर्यंत किंवा तत्पूर्वी** "टीसीएचएफएल"च्या प्राधिकृत अधिकारीकडे सादर करण्यात यावा.
सुरक्षित मत्ता / स्थावर मालमत्तेची विक्री याखाली दिलेल्या संक्षिप्त वर्णनानुसार "जसे आहे जेथे ज्या स्थितीत आहे" या तत्त्वावर करण्यात येईल.

अ. क्र.	लोन अका. नं.	ऋणको/ सह-ऋणको/ विधि वारसदार/ विधि प्रतिनिधी/ हमीदारांची नावे	मागणी सूचनेनुसार रक्कम	राखीव किंमत	इसारा रक्कम	ताब्याचा प्रकार
१)	९११८०७२	श्री. एम. अय्यूब एम. हसन अन्सारी/ श्रीमती असेफा एम. अय्यूब अन्सारी	रु. ५०,८०,०४५/- (रुपये पन्नास लाख ऐंशी हजार पंचेचाळीस फक्त) १९.१०.२०२०	रु. २८,८३,०००/- (रुपये अठ्ठावीस लाख त्र्याऐंशी हजार फक्त)	रु. २,८८,३००/- (रुपये दोन लाख अठ्ठ्याऐंशी हजार तीनशे फक्त)	सांकेतिक
	स्थावर मालमत्तेचे वर्णन : शॉप नं. १ व २, तळमजला, रामा अपार्टमेंट, प्लॉट नं. ११, १२, सर्व्हे नं. ८१३/ए/३, तुल्सी आय हॉस्पिटलच्या पुढे, हॅप्पी होम कॉलनी, नाशिक. **सीमा - शॉप नं. १ :** **पूर्व** - ऑफिस नं. २६ द्वारा; **पश्चिम** - ऑफिस नं. ४ द्वारा; **उत्तर** - ऑफिस नं. २८ द्वारा; **दक्षिण** - पॅसेजद्वारा. **सीमा - शॉप नं. २ :** **पूर्व** - शॉप नं. १ द्वारा; **पश्चिम** - शॉप नं. ३ द्वारा; **उत्तर** - मार्जिनल स्पेसद्वारा; **दक्षिण** - मार्जिनल स्पेसद्वारा.					
२)	९४५१७४९	मेसर्स हिमी कार्गो सर्व्हिसेस इंडिया प्रा. लि. श्री. मंतोष गंगाधर प्रसाद श्रीमती कविता मंतोष प्रसाद	रु. ६१,०२,५७०/- (रुपये एकसष्ट लाख दोन हजार पाचशे सत्तर फक्त) २२.१०.२०१८	फ्लॅट नं. ४ रु. ३४,७४,०००/- (रुपये चौतीस लाख चौऱ्याहत्तर हजार फक्त) व फ्लॅट नं. ८ रु. ४६,७४,०००/- (रुपये शेहेचाळीस लाख चौऱ्याहत्तर हजार फक्त)	फ्लॅट नं. ४ रु. ३,४७,४००/- (रुपये तीन लाख सत्तेचाळीस हजार चारशे फक्त) व फ्लॅट नं. ८ रु. ४,६७,४००/- (रुपये चार लाख सदूसष्ट हजार चारशे फक्त)	सांकेतिक
	स्थावर मालमत्तेचे वर्णन : मालमत्ता - १ : पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे - "जयशाम अपार्टमेंट" म्हणून ज्ञात असलेली पूर्वोक्त प्लॉटवर बांधकाम केलेली फ्लॅट प्रीमायसेस, धारण केलेला **फ्लॅट नं. ४** एरिआ मोजमापाचा ५३.८१ चौ.मी. बिल्ट-अप, तळमजल्यावरील, समाविष्ट २ रुम्स + किचन बाथरुम व इंटरनल पॅसेज व डब्लू.सी. सह, अपार्टमेंट घोषणेत नमूद केल्यानुसार कॉमन एरिआजमधील मालकी व नाशिक येथे स्थित, नाशिक म्युनिसिपल कॉर्पोरेशन नाशिकच्या मर्यादेत, ता. व जि. नाशिक. **पूर्वेला किंवा त्या दिशेने** - ओपन स्पेस भागीरथी सोसायटीद्वारा; **दक्षिणेला किंवा त्या दिशेने** - ओपन स्पेसद्वारा, **पश्चिमेला किंवा त्या दिशेने** - स्टेअरकेसद्वारा; **उत्तरेला किंवा त्या दिशेने** - फ्लॅट नं. ०३ द्वारा. **मालमत्ता - २** : पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे - "जयशाम अपार्टमेंट" म्हणून ज्ञात असलेल्या पूर्वोक्त प्लॉटवर बांधकाम केलेली फ्लॅट प्रीमायसेस, धारण केलेले **फ्लॅट नं. ८** एरिआ मोजमापाचा ७२.३९ चौ.मी. बिल्ट-अप, पहिल्या मजल्यावरील व तळमजल्यास जोडून असलेला (फ्लॅट नं. ४ व फ्लॅट नं. ८ दरम्यान) समाविष्ट ३ रुम्स + किचन बाथरुम व इंटरनल पॅसेज व डब्लू.सी. सह, अपार्टमेंट घोषणेत नमूद केल्यानुसार कॉमन एरिआजमधील मालकी व नाशिक येथे स्थित, नाशिक म्युनिसिपल कॉर्पोरेशन नाशिकच्या मर्यादेत, ता. व जि. नाशिक. **पूर्वेला किंवा त्या दिशेने**- ओपन स्पेस भागीरथी सोसायटीद्वारा; **दक्षिणेला किंवा त्या दिशेने** - ओपन स्पेसद्वारा, **पश्चिमेला किंवा त्या दिशेने** - स्टेअरकेसद्वारा; **उत्तरेला किंवा त्या दिशेने** - फ्लॅट नं. ०७ द्वारा.					
३)	टीसीएचएचएल ०६०१०००१०००८७२५५ व टीसीएचएचएफ ०६०१०००१०००८७२०९	श्री. मोहदकलाक हफिझुउल्लाह शेख, श्रीमती खटून्निसा हफिझुउल्लाह शेख, श्रीमती हफिझुउल्लाह शौकतअली शेख